


## पुराणकथा

कुकडी नदीतीरी दैत्य नेहमी ऋषींच्या कार्यास विघ्ने आणीत. तेव्हा ऋषींच्या मदतीच्या हाकेस गणपती लगेच ओ देऊन येत व विघ्न दूर करी. त्यावरुन त्याचे नाव ओझरचा श्रीविघ्नेश्वर पडले. एकदा सर्व ऋषी गणेशयाग करीत असताना इतर देवतांना बोलविले नाही म्हणून देवादिदेव इंद्राने यमराजाला विघ्नासूर रुप देऊन यज्ञात विघ्न आणावयास सांगितले. देवर्षींनी इंद्राचे गर्वहरण करण्यासाठी गणेशास कळविले. तेव्हा गणेशाने यज्ञ-कुंडातून येऊन विघ्नासुरास पळविले तर विघ्नासूराने ओझर गावी येऊन शुभकार्यात विघ्ने आणली आहेत. तेव्हा गणेशाने पार्श्वऋषींच्या पुत्ररुपाने त्यांच्याशी युध्द केले व शरण आणून जीवनदान दिले तेव्हा भाद्रपद शुध्द चतुर्थीस सर्व देवांनी श्री गणेशाची स्थापना करुन श्री विघ्नेश्वर असे नाव दिले.

ठिकाण : श्री क्षेत्र ओझर, ता. जुन्नर, जि. पुणे

यात्रा : भाद्रपद शु. चतुर्थी व माघ शु. चतुर्थी

मूर्ती : स्वयंभू मूर्ती, डाव्या सोंडेची, आसन मांडी घालून बसलेली पूर्णाकृती पूर्वाभिमुखी, दोन्ही बाजूला रिध्दी सिध्दी

मंदिर : पूर्वाभिमुखी तीन सभामंडप, गाभाऱ्यातील चारी बाजूंना कोनाड्यात चार मूर्ती, दिपमाळा

इतिहास : हे मंदिर अठराव्या शतकाच्या अखेरीस बांधले गेले असे म्हणतात. पहिला बाजीराव, चिमाजी आप्पाने वसई जिंकल्यावर मंदिरावर सोन्याचा कळस चढवला.

---

* 'श्रीं' चे पुजारी *

श्री. हेरंब सिताराम जोशी
श्री. चिंतामण सिताराम जोशी

श्री. भालचंद्र सिताराम जोशी
गणपती देवस्थान ट्रस्ट, ओझर



**।। ॐ श्री विघ्नहर मंगलमुर्ती मोरया ।।**

असा जप सकाळी २१ वेळा करणे